## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. २), मुल, जि. चंद्रपूर
## यांच्या न्यायालयात

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.– ३९८/२०१९ नि. क्र. १६

सरकार विरुध्द सिमा प्रदीप मेश्राम

## आरोपीचे प्रतिकथन

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याचा दिनांक | – | ३१/०१/२०१९ |
| २. गुन्हा दाखल दिनांक | – | ३१/०१/२०१९ |
| ३. फिर्यादीचे नाव | – | महाराष्ट्र सरकार, मार्फत श्री.अकबरखाँ मेहमूदखाँ पठाण, पोलीस हवालदार, पोलीस ठाणे मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर. |
| ४. आरोपीचे नाव | – | सिमा प्रदीप मेश्राम,<br>वय– ३५ वर्षे, धंदा – मजूरी,<br>रा. केळझर, ता. मूल,<br>जि.– चंद्रपूर. |

५. गुन्ह्याचा तपशिल –

तुम्ही दिनांक ३१/०१/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास केळझर, ता. मूल, जि. चंद्रपूर येथील तुमच्या राहत्या घराच्या एका कोपऱ्यात खरड्याच्या खोक्यात प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या देशी दारू सुपर सॉनिक रॉकेट संत्रा कंपनीच्या १०० बाटल्या बेकायदेशिरपणे विक्री करण्याच्या उद्देशाने तुमच्या कब्जात बाळगताना मिळून आलात व त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये अपराध केला आहे.

**६. प्रमाणपत्र –**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीस गुन्ह्याचा उपरोक्त तपशिल मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितला.

**७. आरोपीचे प्रतिकथन –**

प्र. क्र. १ तुम्हाला आरोप पत्र व संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या आहेत काय?

उत्तर– होय.

प्र. क्र. २ तुम्हाला समजावून सांगितलेला गुन्ह्याचा उपरोक्त तपशिल समजला आहे काय?

उत्तर– होय.

प्र. क्र. ३ तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – मला गून्हा कबूल नाही.

दिनांकः– ०५/०२/२०२४

स्वाक्षरीत/-

आरोपीची सही/अंगठा

(स. दि. कमलाकर)
प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी,
(न्यायालय क्र. २),मुल.